# आई

**मॅक्झिम गोर्की**

अनुवाद

**डॉ. अरुण मांडे**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**आई :** मॅक्झिम गोर्की
अनुवाद : डॉ. अरुण मांडे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**
डॉ. अरुण मांडे
कार्तिक अपार्टमेंट, प्रोफेसर कॉलनी,
अहमदनगर.
फोन नं. ०२४१ - २४२४२७३

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४२०/-

# भाग – १

## १

कामगारांच्या धुरकट आणि तेलकट वस्तीमधल्या वातावरणात कारखान्याचा भोंगा वाजायला लागला की, वस्तीतील लोक घाबरून झुरळासारखे आपापल्या खुराड्यातून बाहेर पडत. अपुऱ्या झोपेनं आळसावलेल्या, अपुऱ्या विश्रांतीमुळं आंबलेल्या शरीरानं आणि खिन्न चेहऱ्यानं, पहाटेच्या अंधारात, थंडीनं काकडत, अरुंद आणि कच्च्या रस्त्यावरून कारखान्याच्या उंच दगडी कोठड्यांमध्ये जायला निघत. कारखान्याची इमारतही चौकोनी दिव्यांचा तेलकट पिवळसर प्रकाश रस्त्यावर पाडत थंडपणे आणि निर्विकारपणे त्यांची वाट बघत असे. त्यांच्या पायाखाली तुडवला जाणारा चिखल पचक-पचक करीत उगीचच त्यांचा कळवळा आल्यासारखं दाखवे. झोपेनं सुस्तावलेल्या आणि खर्जातल्या आवाजात त्यांच्या अचकट-विचकट शिव्यांनी, कारखान्याच्या यंत्रांच्या घरघरीनं आणि इंजिनाच्या वाफेच्या फुत्कारानं वातावरण भरून गेलेलं असे. कारखान्याची उंच, ताठ काळीकुट्ट धुराडी जणू कामगार वस्तीवर उगारलेले सोटेच आहेत असे वाटत असे.

संध्याकाळची उतरती किरणं खिडक्यांच्या तावदानांवर रेंगाळायला लागली की, कारखाना विझलेल्या राखेसारखा कामगारांना बाहेर झटकून टाकत असे आणि ते काळवंडलेल्या चेहऱ्यानं, अंगाला येणाऱ्या यंत्राच्या तेलाचा वास हवेत सोडत, भुकेनं वखवखलेले पिवळे दात दाखवत पुन्हा रस्त्यावरून घराकडे चालू लागत; पण त्यांच्या आवाजात जिवंतपणा असे, आनंदही असे. काबाडकष्टाचा एक दिवस संपला होता. जेवणासाठी आणि विश्रांतीसाठी घर त्यांची वाट पाहत होतं.

एक दिवस कारखान्याने गिळून घेतला होता. यंत्रांनी माणसांना पिळून काढले होते. आयुष्यातला एक दिवस शोषून घेतल्यासारखा नाहीसा झाला होता. कामगाराचे आणखी एक पाऊल मरणाच्या दिशेने पडले होते; पण तो मात्र विश्रांती आणि गुत्त्यामधला दारूचा वास एवढ्या दोन कल्पनांनीच संतुष्ट होता.

सुटीच्या दिवशी कामगार सकाळी दहापर्यंत झोपत. जीवनात स्थिर झालेली विवाहित कामगार मंडळी चांगले कपडे घालून बाहेर पडत. वाटेनं जाताना, धर्माविषयी

आस्था नसलेल्या तरुणांना उपदेशाचे डोस पाजत ते चर्चमध्ये प्रार्थनेसाठी जात. चर्चहून परत आले की, रशियातली प्रसिध्द पास्ट्री-पिरॉगह्न खाऊन पुन्हा संध्याकाळपर्यंत ताणून देत असत. वर्षानुवर्षांपासूनच्या शरीरात मुरलेल्या थकव्यानं त्यांची भूक केव्हाच मेली होती; पण भूक लागावी म्हणून दारूचे घोट घेत आणि व्होडकाच्या जळजळीत कडक मद्यानं भुकेची आग शांत करीत.

संध्याकाळी बहुतेकजण विरंगुळ्यासाठी घराबाहेर पडून रस्त्यावर फिरत. ज्यांच्याकडे पावसाळी बूट असत, ते रस्त्यावर चिखल नसला तरी बूट घालत आणि ज्यांच्याकडे छत्र्या असत, ते स्वच्छ सूर्यप्रकाश असला तरी हातात छत्र्या घेऊन हिंडत. प्रत्येकाकडे पावसाळी बूट आणि छत्री नसे; पण लहानशी गोष्ट का असेना, इतरांपेक्षा आपण वेगळे दिसण्याचा त्यांचा प्रयत्न असे.

एकमेकांना भेटल्यावर त्यांच्या बोलण्याचे विषय कारखाना, यंत्रे आणि मुकादमाविषयी राग एवढेच असत. ते कामासंबंधीच बोलत आणि कामासंबंधीच विचार करीत. त्यांच्या कंटाळवाण्या रटाळ बोलण्यात कधीतरी मोकाट विचाराची अंधुकशी ठिणगी चमकून विझत असे. घरी आल्यावर ते बायकांशी भांडत, त्यांच्यावर हातही टाकत. तरुण लोक दारूच्या गुत्त्यात बसत किंवा मित्रांच्या घरी पार्ट्या करीत. ॲकॉर्डियन वाजवीत अश्लील गाणी म्हणत. नाचत, दारू पिऊन तर्र होत शिवीगाळ करीत.

अतिश्रमानं आलेला थकवा घालवण्यासाठी ते एकावर एक घोट घेत. त्यामुळं त्यांच्या उरात अगम्य अशी एक विकृत चीड दबलेली असे. ती बाहेर काढण्यासाठी ते बैचैन होत. मग अगदी क्षुल्लक कारणासाठीसुध्दा ते हिंस्र श्वापदासारखे एकमेकांवर तुटून पडत. एकमेकांना रक्तबंबाळ करीत. कधी कधी तर खूनही करीत.

त्यांच्या शरीरातल्या पुरातन थकव्याइतकाच परस्परांविषयीचा सुप्त द्वेष सतत वाढतच होता. आत्म्याच्या विकृतीचा हा वारसा त्यांना त्यांच्या वाडवडिलांकडून मिळाला होता. हिडीस, किळसवाणी, निरुद्देश अघोरी कृत्यांना उद्युक्त करणारी ही विकृती एखाद्या सावलीसारखी त्यांना स्मशानापर्यंत सोबत करणार होती.

सुटीच्या दिवशी तरुण मंडळी खूप उशिरा घरी येत. त्यांचे कपडे धुळीनं, चिखलानं माखलेले आणि फाटलेले, डोळे सुजलेले, चेहऱ्यावर जखमा अशा अवस्थेत येत. हाणामारीत कुणाला कसं लोळवल्याच्या बढाया मारीत किंवा स्वत:च चीत झाल्यामुळे अपमानित होऊन जखमा चाटीत येत. दारूच्या नशेत कधी रडायचेसुध्दा. कधी कधी ही मुलं रस्त्याच्या कडेला, नाहीतर दारूच्या गुत्त्यात झिंगून पडलेली असत. त्यांचे आई-वडील त्यांना शोधून आणीत. शिव्या देत, मारहाण करीत घरी नेत; परंतु काळजीपूर्वक अंथरुणावर झोपवत, कारण पहाटे भोंगा होताना त्यांना जागे करून उठवायचं असतं.

ही वडीलधारी माणसं आपल्या मुलांना शिव्या देत होती, चोपून काढत होती हे खरं; पण तरुणपणी सगळेचजण असं करतात. त्यांचे बापही तरुणपणी असे पिऊन झिंगत होते, भांडत होते आणि त्यांचे आई-बापही त्यांना असे चोपून काढत होते. वर्षानुवर्षांपासून असंच तर चालू होतं. वर्षानुवर्षांपासून ते एखाद्या गढूळ पाण्याच्या प्रवाहासारखं संथपणे आणि शांतपणे वाहत होतं. रूढी आणि परंपरेच्या पुरातन चाकोरीतून ही माणसं सवयीनं तेच ते रटाळ जीवन जगत होती. यात बदल घडवून आणण्याची कुणाची इच्छाही नव्हती आणि कुणाला वेळही नव्हता.

कधीतरी एखादा नवागत त्यांच्या वस्तीत येत असे. नवीन असल्यामुळे लोकांचं लक्ष त्याच्याकडे जात असे. आधी तो ज्या ठिकाणी काम करीत होता, त्याविषयी बोलायला लागला की, लोक त्याचं बोलणं किंचितशा उत्सुकतेनं ऐकायचे; पण काबाडकष्ट करणाऱ्या माणसाचं जीवन इथून तिथून सारखंच असतं, हे समजल्यावर ऐकण्यातली उत्सुकताही संपून जाई. सगळीकडे असंच असेल तर मग बोलायचं तरी काय?

पण, कधीतरी एखादा नवागत कधी न ऐकलेल्या गोष्टी बोलायचा. त्याच्याशी कुणी वाद घालीत नसे; पण त्याच्या बोलण्यावर कुणी विश्‍वासही ठेवत नसे. काही जणांना त्याचा राग येत असे, तर काहीजण घाबरून दचकतही असत; पण काही जणांच्या मनात कुठला तरी आशेचा एक किरण अंधुकसा प्रकट होत असे; पण आशा कशाची हे मात्र त्यांना समजत नसे आणि आपल्या मनातली निष्कारण वाढलेली अस्वस्थता घालवण्यासाठी ते नेहमीपेक्षा जास्तच दारू पीत.

एखादा माणूस वेगळा वाटला तर वस्तीतली माणसं घाबरून त्याच्यापासून दोन हात दूरच राहत. त्यांच्या शांत आणि संथ जीवनात हा माणूस खळबळ माजवायला आलाय, अशी त्यांना भीती वाटत असे. परिस्थिती कितीही वाईट असली आणि जीवन कितीही खडतर असलं तरी लोकांना त्याची सवय झाली होती. त्यात कधीच बदल होणार नाही आणि झालाच तर कष्टांचं ओझं आणखीनच वाढेल, अशी भीती त्यांना वाटत असे.

असं काही वेगळं बोलणाऱ्या माणसापासून लोक चार पावलं दूर राहत. तो माणूसही त्यांच्याशी अलिप्तपणे वागत असे किंवा मग त्यांच्यासारखाच बनून जात असे.

अशा प्रकारचं आयुष्य जगणारा माणूस पन्नास वर्षं जगून मरून जात असे.

मिखाईल व्लोसावसुध्दा अशाच प्रकारचं आयुष्य जगत होता. तो चिडखोर आणि तुसड्या स्वभावाचा होता. जाडजूड भुवयांखालचे डोळे बारीक करून तो सगळ्यांकडे दुष्टपणे हसून तुच्छतेने आणि संशयानं बघायचा. कारखान्यातला तो सगळ्यात हुशार कामगार आणि वस्तीमधला सर्वात ताकदवान माणूस होता; पण त्याच्या भांडखोर

स्वभावामुळे आणि मुकादमाशी व वरिष्ठांशी कधीच पटत नसल्यामुळे त्याची कमाई खूप कमी होती. सुटीच्या दिवशी कुणाला तरी बदडून काढल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. सगळेजण त्याचा तिरस्कार करीत होते आणि त्याला घाबरत होते.

त्याचे उट्टे काढण्याचा प्रयत्न बरेच वेळा आणि बरेच जणांनी केला; पण वाया गेला. त्याच्यावर कुणी हल्ला करायला गेलं तर तो हातात एखादा दगड, फळकूट, किंवा लोखंडी कांब घेऊन पाय फाकवून शांतपणे शत्रूची वाट पाहत उभा राहत असे. डोळ्यांपासून मानेपर्यंत दाढीमिशांच्या जंजाळानं झाकलेला त्याचा चेहरा आणि केसाळ बाहू बघून कुणालाही कापरं भरत असे. लोकांना त्याच्या डोळ्यांची जास्त भीती वाटायची. त्याची नजर एखाद्या गिरमिटासारखी भेदत जाणारी होती. बघणाऱ्याला तो सावजावर तुटून पडणारा एखादा निर्दयी हिंस्र पशूच वाटत असे.

''उंदरांनो, पळा इथून–'' तो त्यांच्यावर ओरडायचा. ''चालते व्हा.''

ओरडताना दाढीमिशांच्या जंजाळातून त्याचे वाकडे तिकडे पिवळे दात चमकून उठत. त्याला शिव्या देत लोक मागं सरायचे.

''उंदरांनो!'' तो पुन्हा वसकन् त्यांच्या अंगावर ओरडायचा. त्याच्या डोळ्यांत घुबडासारखं छद्मी हास्य असायचं. मान थोडीशी पुढं झुकवून, आखूड आणि जाड पाईप दातांमध्ये दाबून, त्यांच्या अंगावर धावून जात तो ओरडायचा ''कुणाला मरायचंय त्यानं पुढं यावं.''

कुणालाही मरायचं नव्हतं.

तसा तो कमी बोलायचा; पण 'उंदरांनो' ही त्याची आवडती शिवी होती. कारखान्यातल्या साहेबांना आणि पोलिसांना, एवढंच नव्हे, तर बायकोलासुध्दा हीच शिवी द्यायचा.

''चिचुंद्रे, माझे कपडे फाटलेयत, डोळे फुटलेत का तुझे?'' तो ओरडायचा.

चौदा वर्षांच्या त्याच्या मुलाचे–पॉवेलचे केस ओढण्याचा त्यानं एकदा प्रयत्न केला; पण पॉवेलनं एक जाडजूड हातोडा उगारून बापाला धमकावलं. ''अंगाला हात लावायचा नाही.''

''काय म्हणालास?'' उंच, पण किडकिडीत मुलाच्या अंगावर झाडाच्या सावलीसारखा झुकून तो ओरडला.

''आता बस.'' पॉवेल म्हणाला, ''बस झाला तुझा छळ.''

डोळे वटारून त्यानं पुन्हा हातोडा उगारला.

बापानं त्याच्याकडे बघितलं. केसाळ हात पाठीमागे दडवले. हसून तो म्हणाला, ''ठीक आहे.'' मग एक फुत्कार सोडीत म्हणाला ''उंदरा!''

मग काही वेळानं तो बायकोला म्हणाला, ''इथून पुढं मला पैसे मागू नकोस. पाशाला मागत जा.''

''आणि तुझे सगळे पैसे दारूत घालवशील, हो ना?'' धाडस गोळा करून ती म्हणाली.

''मी काहीही करीन, चिचुंद्रे!'' तो ओरडला.

तेव्हापासून पुढच्या तीन वर्षात म्हणजे तो मरेपर्यंत त्यानं मुलाकडे कधी लक्ष दिलं नाही की कधी त्याच्याशी बोललासुध्दा नाही.

व्लोसॉवने एक कुत्री पाळली होती. तीसुध्दा त्याच्यासारखीच भारदस्त आणि केसाळ होती. तो कामावर जाताना ती सकाळी त्याच्यासोबत जात असे आणि संध्याकाळी तो कामावरून येईपर्यंत फाटकापाशी त्याची वाट पाहत बसे. सुटीच्या दिवशी तो गुत्त्यामध्ये जात असे. तो कुणाशी बोलत नसे. चालताना कुणाला तरी शोधत असल्यासारखा माणसं न्याहाळीत असे. दिवसभर त्याच्या मागोमाग त्याची कुत्री पण फिरत असे. रात्री घरी आल्यावर तो जेवायला बसे. आपल्याच ताटातला घास कुत्रीला खायला देत असे. कुत्रीला त्यानं कधी बदडलं नाही, तिच्यावर कधी ओरडला नाही की कधी तिला गोंजारलं पण नाही. जेवणानंतर बायकोनं ताट लवकर उचललं नाही तर तो ताट टेबलावरून सरळ फेकून देत असे. हातात व्हिस्कीची बाटली घेऊन, भिंतीला टेकून, डोळे मिटून घेई आणि भसाड्या आवाजात तोंड वेडंवाकडं करीत गात असे. त्याचे करुण स्वर दाढी-मिशांमधून अडखळत बाहेर पडताना त्यात अडकलेले ब्रेडचे कणसुध्दा खाली पडत. बेसूर आणि असंबध्द गाताना तो आपल्या दाढी-मिशांवरून हात फिरवीत असे. बाटलीतली व्हिस्की असेपर्यंत त्याचं गाणं चालू राही. मग तो तिथंच सकाळचा भोंगा वाजेपर्यंत बसल्या जागी बाकावर किंवा टेबलावर डोकं टेकून लुढकत असे. त्याची कुत्री त्याच्यापाशीच बसून राही.

त्याचं मरणही खूप त्रासाचं होतं. पाच दिवस तो अंथरुणावर तळमळत पडला होता. त्याचा चेहरा काळाठिक्कर पडला होता. डोळे बंद करून तो दातांवर दात आवळायचा. कधी बायकोला म्हणायचा, ''अर्सेनिक आण. विष घालून सुटका कर माझी.''

तिनं डॉक्टरांना बोलावले. त्यानं पोटीस लावायला सांगितले; पण ऑपरेशनची गरज आहे आणि त्यासाठी इस्पितळात ताबडतोब हलवावं लागेल, असंही सांगितलं.

''खड्ड्यात जा. मी माझ्या मरणानं मरेन, उंदरा!''

डॉक्टर गेल्यावर बायकोनं डोळ्यांत पाणी आणून त्याला ऑपरेशन करून घेण्याची विनवणी केली.

मुठी आवळून धमकी देत तो म्हणाला, ''मी जिवंत राहिलो तर तुलाच जास्त त्रास होईल.''

पहाटे कारखान्याचा भोंगा वाजण्याच्या सुमारासच तो गेला. शवपेटीमध्येसुध्दा त्याचं तोंड उघडंच होतं. भुवयासुध्दा कुणावर तरी संतापल्यासारख्या ताणलेल्या होत्या. दफन करताना तिथं त्याची बायको, मुलगा, त्याची कुत्री, एक म्हातारा दारुड्या आणि दानिलो वसोव्हचिकोव्ह नावाचा एक भुरटा चोर आणि वस्तीतले काही भिकारी होते. त्याच्या बायकोनं त्याच्या नावानं चार अश्रू ढाळले. पॉवेलच्या डोळ्यांत मात्र पाण्याचा टिपूस नव्हता. प्रेतयात्रा रस्त्यानं जाताना लोक थांबायचे, छातीवर क्रुसाची खूण करायचे आणि आपापसात म्हणायचे, ''तो मेल्यानं सुटली बिचारी पेलिगिया.''

दुसरा म्हणायचा, ''मेला कसला! बेवारशी कुत्र्यासारखा सडून मेला.''

जमिनीत दफन केल्यावर लोक निघून गेले. त्याची कुत्री तिथंच थांबली. ढिगाऱ्यावर बसून ताजी खोदलेली माती हुंगत राहिली.

## २

बाप मेल्यावर दोन आठवड्यांनी एके दिवशी पॉवेल दारू पिऊन घरी आला.

झोकांड्या खात कसाबसा तो बाकावर बसला. टेबलावर मूठ आदळून बापाप्रमाणंच आईच्या अंगावर ओरडून म्हणाला, ''जेवायला वाढ.''

आई त्याच्याजवळ जाऊन बसली. हातानं ओढून त्याला छातीशी धरलं. हातानं तिच्या खांद्याला धक्का देऊन दूर लोटत तो तिच्या अंगावर पुन्हा ओरडला,

''वाढ म्हणतो ना!''

''वेडा आहेस!'' त्याला आवरायचा प्रयत्न करीत ती व्यथित स्वरात, पण काळजीनं म्हणाली.

''आता मी तंबाखू ओढणार आहे. बापाचा पाईप दे मला,'' जड झालेल्या जिभेनं तो अडखळत म्हणाला.

दारू प्यायची त्याची पहिलीच वेळ होती. दारूनं त्याचं अंग सैलसर झालं होतं; पण त्याची अजून शुध्द गेली नव्हती. त्याच्या डोक्यात एकच प्रश्न सारखा सारखा घोळत होता, मी खरंच प्यायलोय का?

आईच्या प्रेमळ स्पर्शानं तो अस्वस्थ झाला होता. तिच्या डोळ्यांतलं दु:ख बघून तो हेलावून गेला. त्याला रडावंसं वाटत होतं; पण स्वत:ला रोखून धरण्यासाठी त्यानं दारू जरा जास्तच चढल्याचं ढोंग केलं.

त्याच्या केसांवरून प्रेमानं हात फिरवत ती हळुवारपणे म्हणाली, ''असं करू नये बाळा. का केलंस तू?''

त्याला एकदम मळमळायला लागलं. एक मोठी उलटी झाल्यावर आईनं त्याला अंथरुणावर निजवलं. ओलसर टॉवेलची घडी त्याच्या कपाळावर ठेवली. त्याला थोडंसं बरं वाटायला लागलं; पण त्याच्या भोवतालच्या सगळ्या वस्तू गरगर फिरतायत, असं वाटत होतं. त्याचे डोळे जड झाले होते. त्याचं तोंड कडू पडलं होतं. अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनी त्यानं आपल्या आईकडे बघितलं. त्याच्या मनात विस्कळीत विचार येत होते.

प्यायची एवढी घाई करायला नको होती. बाकीचे पितात, त्यांना काही होत नाही. मलाच असं का झालं बरं?

''तू जर असा प्यायला लागलास तर आपलं पोट भरणार कसं?'' आई म्हणाली. तिचा आवाज खूप दुरून ऐकू येत असल्यासारखा त्याला वाटला.

त्यानं डोळे घट्ट मिटून घेतले आणि तो म्हणाला, ''सगळेच पितात.''

आईनं एक उसासा टाकला. खरंय ते. वस्तीमध्ये दारूच्या गुत्त्याशिवाय विरंगुळ्याचं कोणतंच साधन नव्हतं आणि व्हिस्कीशिवाय समाधान देणारं दुसरं काहीच नव्हतं. तरीसुध्दा ती म्हणाली, ''पण, तू पिऊ नकोस. तुझा बाप तुझ्या वाटणीची दारू पण ढोसून गेलाय. त्यानं छळलंयही तेवढंच मला. तू तरी माझ्यावर दया कर.''

तिचं करुण, हळुवार बोलणं ऐकताना, बाप जिवंत होता तेव्हा आपण तिच्याकडे कधीच लक्ष दिलं नाही याची त्याला जाणीव झाली. मार बसण्याच्या भीतीनं ती घरात गप्प राहूनच वावरायची. बापाला टाळण्यासाठी तो नेहमी उशिराच घरी येत असे. त्यामुळं आईपासून तो खूपच दुरावला होता. तो आता बराचसा शांत झाला होता. त्यानं आईकडे जरा निरखून बघितलं.

ती उंच होती. थोडीशी पाठीत वाकली होती. आयुष्यभराच्या काबाडकष्टांमुळं आणि नवऱ्याच्या हातचा मार खाण्यामुळं तिचं शरीर जीर्ण झालं होतं. घरात ती आवाज न करता चालायची. धक्का लागून काही पडू नये म्हणून ती एका बाजूला अंग चोरून चालायची. तिच्या सुरकुत्या पडलेल्या रुंद आणि अंडाकृती चेहऱ्यावर थोडीशी सूज होती. तिच्या काळ्याभोर डोळ्यांत वस्तीतल्या इतर बायकांप्रमाणे दुखावल्याची खिन्न छटा होती. तिच्या उजव्या भुवईवर एक खोल व्रण होता. त्यामुळे तिची ती भुवई उंचावल्यासारखी वाटायची. तिचा उजवा कानसुध्दा डाव्या कानापेक्षा जरा उंचच वाटायचा. त्यामुळं ती सावधपणे काहीतरी कान देऊन ऐकत

असल्यासारखी वाटे. तिच्या काळ्याभोर दाट केसांमध्ये थोडेसे पांढरे केस चमकायला लागले होते. ती मार्दव, केविलवाणी आणि शरणागत अशीच दिसायची.

तिच्या गालांवरून आसवं ओघळायला लागली.

''रडू नकोस आई!'' तो म्हणाला ''मला पाणी हवं.''

ती उठताना म्हणाली, ''थांब, मी तुला बर्फाचं पाणी आणते.''

ती पाणी घेऊन आली तेव्हा त्याला शांत झोप लागली होती. ती क्षणभर त्याच्याजवळ हलकेच श्वास घेत उभी राहिली. तिच्या हातातला पत्र्याचा टमरेल थरथरत होता. त्यामुळं पाण्यातला बर्फ आवाज करीत हिंदकळत होता. तिनं टमरेल टेबलावर ठेवला. भिंतीवर लावलेल्या परमेश्वराच्या चित्रासमोर गुडघे टेकून ती मनातल्या मनात प्रार्थना करू लागली. बाहेरच्या रस्त्यावरचं दारुड्याचं बरळणं खिडक्यांच्या तावदानांवर आदळत होतं. हिवाळ्यातल्या रात्रीच्या थंड हवेत आणि धुक्यात कुणाचा तरी ॲकॉर्डियन किंचाळत होता. कुणीतरी उंच आवाजात गात होतं. कुणीतरी शिव्यांची लाखोली वाहत होतं. त्यातच थकलेल्या आणि चिडलेल्या बायकांचे आवाजही ऐकू येत होते.

व्लोसावच्या घरातलं आयुष्य पूर्वीसारखंच संथपणे आणि शांतपणे, परंतु इतरांपेक्षा जरा वेगळं वाहू लागलं.

त्यांचं घर वस्तीच्या एका टोकाला थोड्याशा उतरत्या व दलदलीच्या जागेवर होतं. घरातल्या लहानशा भागात स्वयंपाकघर होतं. त्याच्या शेजारी आईची झोपायची खोली. दोन्हीच्या मधोमध छतापर्यंत उंच असं एक पार्टिशन होतं. उरलेल्या भागात दोन खिडक्यांची एक चौरस खोली होती. एका कोपऱ्यात पॉवेलची खाट होती. समोरच्या भागात एक टेबल आणि दोन बाकं होती. काही खुर्च्या, एक समोर आरसा असलेलं वॉशस्टँड होतं. कपड्यांनी भरलेली एक संदूक होती. भिंतीवर एक घड्याळ होतं. कोपऱ्यात दोन मूर्तींचं- एवढंच होतं.

पावेल इतरांसारखंच जगत होता. इतर तरुणांप्रमाणेच वागत होता. त्यानं एक ॲकॉर्डियन, एक कांजी लावलेला सदरा, एक भडक रंगाचा टाय, पावसाळी बूट आणि एक छडी विकत घेतली होती. त्याच्या वयाला साजेसंच तो सगळं करीत होता. त्यानं क्वाड्रिली आणि पोलका डान्स शिकून घेतला होता. सुटीच्या दिवशी तो दारू पिऊनच घरी येत असे; पण दारूचा त्याला खूपच त्रास होत असे. सकाळी उठल्यावर त्याचं डोकं जड व्हायचं. छातीत जळजळ व्हायची. चेहरा फिकट आणि सुकलेला असायचा.

एकदा आईनं विचारलं, ''कालची रात्र मजेत गेली ना?''